पुढारी

# ‘रवळनाथ’च्या ठेव व्याजदरात वाढ

## नववर्षाची भेट : महिला, सैनिक व ज्येष्ठ नागरिकांना दिलासा

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीने ठेवींच्या व्याजदरात वाढ केली आहे. विशेष व्याजामुळे महिला, आजी-माजी सैनिक व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दि. १ जानेवारी २०२३ पासून नव्या व्याजदराची अंबलबजावणी होईल, अशी माहिती संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या रेपो रेटमध्ये झालेली वाढ आणि केंद्र सरकारनेही चालू आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीसाठी (जानेवारी ते मार्च २०२३) काही प्रमुख अल्पबचत योजनांच्या व्याजदरात वाढ केली आहे. या पार्श्वभूमीवर रवळनाथ सोसायटीनेही ठेवींच्या व्याजदरात आकर्षक वाढ करून व्यक्तिगत ठेवीदारांना नववर्षाची अनोखी भेट दिली आहे.

नव्या व्याज दरामुळे सेव्हिग ठेवींना-(४ टक्के), श्री रवळनाथ सेव्हिंग ठेवींना (५.५०) व्याज मिळेल. ३१ ते ४५ दिवसांसाठी (६), ४६ ते ९० दिवसांसाठी (६.२५), ३ ते १२ महिन्यांसाठी (६.५०), १३ ते ५९ महिन्यांसाठी (७.५०), तर ६० महिने व त्यापुढील कालावधीसाठी (७.७५) इतका व्याजदर मिळणार आहे. नव्या व्याज दराचा अधिकाधिक ठेवीदारांनी लाभ घ्यावा, अधिक माहितीसाठी शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन चौगुले यांनी केले आहे. यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सीईओ डी. के. मायदेव व अधिकारी, सभासद उपस्थित होते.

१५ महिने मुदतीसाठी महिला, आजी-माजी सैनिक व संस्था ठेवीदारांना (८.२५ टक्के), तर ६० महिने मुदतीसाठी ज्येष्ठ नागरिकांच्या ठेवींना (८.२५) व्याज देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. महिला व आजी-माजी सैनिक यांना ठेव व्याजदरात पाव टक्का जादा व्याजदर व कर्जातही अर्धा टक्का सवलत देणारी रवळनाथ सोसायटी ही एकमेव संस्था आहे, असे चौगुले यांनी सांगितले.

My Kolhapur Edition
Jan 5, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in